नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०८/२०२५ (शुक्रवार)**

---

## मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस– जनता सवांद सभा घेवुन जनतेसोबत साधला सुसंवाद

दिनांक ०१/०८/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत खातरोड, कोदामेंढी येथील देखमुख लॉन येथे पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील जनतेसोबत सुसंवाद साधुन त्यांच्या अडी–आडचणी जाणुन घेतल्या. मा. पोलीस अधिक्षकांनी तात्काळ जन सामन्यांच्या अडचणी सोडविल्या. तसेच लवकारात लवकर जन सामन्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत संबधितांना आदेशीत केले. उपस्थित जनतेने मनमोकळे पणाने मा. पोलीस अधिक्षकांशी संवाद साधुन स्वत:च्या अडचणी त्यांच्या समोर मांडल्या. नमुद सभेत १०० ते १५० जनसमुदाय हजर होता. सदर सभेला श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, सहा.पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अरोली आणि पोलीस स्टेशन अरोलीचे अधिकारी अंमलदार हजर होते.



उपस्थिती
.रमेश बरकते
गीय पोलीस अधिकारी, रामटेक
श्री. स्नेहल राऊत
सहा. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन अरोली
पोलीस स्टेशन अरो
पूर ग्रामीण








# पाण्याच्या मोटार पंप चोरीचा गुन्हा उघड, ४ आरोपी अटक
# मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील अंबाडी शेत शिवारातील वेगवेगळया शेतातुन दि. १६/०७/२०२५ रोजीचे रात्री दरम्यान अज्ञात आरोपीतांनी शेती उपयोगी पाण्याच्या मोटार पंप चोरी केल्याच्या फिर्यादीच्या तक्रारीवरुन कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

मौदा पोलीसांनी सदर गुन्हयाचा तात्काळ तपास सुरू करून गुन्हे शोध पथकांने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सदर गुन्हयात **१) गुलशन मुरलीधर मरसकोल्हे, वय २१ वर्षे, २) राजतिलक मुरलीधर मरसकोल्हे, वय १९ वर्षे, ३) सुमेध विनायक गणवीर, वय २३ वर्षे, तिन्ही रा. खेडेपार, ता. लाखणी, जि. भंडारा, ह.मु. वडोदा, ता. कामठी, जि. नागपुर तसेच आरोपी क्रं ४) चोरीच्या मोटार पंप विकत घेणारा भंगार व्यवसायीक आरोपी नामे अखिलेश लक्ष्मीप्रसाद शाहु, वय २७ वर्षे, रा. यशोधरानगर, नागपुर, ह.मु. वडोदा शिवार, ता. कामठी, जि. नागपुर** यांना अटक करुन त्यांचेकडुन वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ८ मोटार पंप किंमती ४०,०००/— रूपये तसेच चोरीच्या गुन्ह्यात वापरलेल्या मोटर सायकल हिरो स्प्लेन्डर प्लस मो.सा. क्र.एम.एच ४० सी यु ८७३२ आणि हिरो कंपनीची पॅशन प्रो मो.सा. क्र. एम.एच ३४ ए.जी २९३७ असा एकुण १,५०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन गुन्ह्यातील पाहीजे आरोपी आयुष चौधरी, रा. वडोदा याचा शोध सुरु आहे.




**अंमली पदर्थ बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद,**
**४ आरोपी अटक, ३ लाख ८३ हजार ५५० रूपयांचा मुद्देमाल जप्त**
**स्थानिक गुन्हे शाखा आणि बुट्टीबोरी पोलीसांची संयुक्त कारवाई**

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— दिनांक ३१/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, आरोपी नामे रविंद्रसिंग उर्फ कालु लखनसिंग जुनी हा गोसावी नगर,बुटीबोरी ता.जि. नागपुर येथील त्याचे घरात अंमली पदार्थ गांजा व एम.डी बाळगुन त्याची विक्री करीत आहे. अशा महीतीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुट्टीबोरी पोलीसांच्या मदतीने सापळा रचुन कारवाई केली असता **पाहीजे आरोपी क्रमांक १) रविंद्रसिंग उर्फ कालु लखनसिंग जुनी रा. गोसावी नगर याचे घरी त्याचेच सांगणेवरून आरोपी क्रं २) नामे अर्जुन कान्हासिंग जुनोने, वय ३४ वर्षे, रा. देवरी सावंगी,जि वर्धा ह.मु. गोसावी नगर, ता.जि. नागपुर हा आरोपी क्रं ३) अतुल अंकुशराव निमसरे, वय २४ वर्ष, रा. पिपरी मेघे, कारला चौक, जि. वर्धा , ४) गेंदु श्याराव गोंदी ,वय**

**२९ वर्षे, ५) अभिजीत उर्फ गिरीष सदानंद सुरनकर, वय २० वर्ष, कारला चौक, जि. वर्धा आणि क्रं ६) एक विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांना अंमली पदार्थ गांजा आणि एम.डी विक्री करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद घराची झडती घेतली असता ३.८९ ग्रॅम एम.डी आणि १६७ ग्रॅम गांजा, चार अॅड्रॉइड मोबाईल आणि चार दुचाकी वाहनांसह एकुण किंमती ३,८३,५५०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

वर नमुद आरोपीतांविरूध्द कलम ८ (क), २०(ब) (२) (अ), २२ (ब), २९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्रं २ ते ५ यांना अटक करण्यात आली आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयात नागपुर विभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी आणि एमआयडीसी बोरी येथे मोकाट जनावरांच्या मालकांवर करण्यात आल्या ३० कारवाया

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत महामार्गावरील मोकाट जनावरांच्या कळपामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असुन अपघात होण्याची सुध्दा शक्यता नाकारता येत नाही. दिनांक १७/०७/२०२५ ते दिनांक २८/०७/२०२५ रोजी पर्यंत नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत नागपुर उपविभागात ज्या मालकांची जनावरे रस्त्यांवर मोकाट फिरत असतील अशा जनावरांच्या मालकांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १००,१०६,१०७ अन्वये पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे **२७ कारवाया करण्यात आल्या तसेच पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ०३ कारवाया अशा एकुण ३० कारवाया करण्यात आल्या आहेत.**

## अवैधरित्या तंबाखुजन्य पदार्थ (खर्रा) विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द COTPA कायदयान्वये करण्यात आल्या १५ कारवाया

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :—** नागपुर ग्रामीण जिल्हयात बुटीबोरी पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक ३०/०७/२०२५ ते दिनांक ३१/०७/२०२५ रोजी पर्यंत अवैध रित्या तंबाखुजन्य पदार्थ **(खर्रा) विक्री करणाऱ्यांवर कलम ४ COTPA कायदयान्वये १५ कारवाया करण्यात आल्या आहेत.**

**तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयांअतर्गत शाळा कॉलेज परीसरात सतत पेट्रोलींग करून COTPA कायदयान्वये करावाई करण्यात येत आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद , ६१ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ३१/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा उखळी फाटा एस.एम.एस कंपनी जवळ नाकाबंदी केली असता १) १२ चक्का टिप्पर क्र एम.एच ४० सी.टी ९३३४ २) टिप्पर क्र एम एच ४९ बी झेड ५१६४ हे दोन वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर क्र एम. एच ४० सी टी ९३३४ चा चालक नामे फिरोज युसुफ खान, वय ५२ वर्षे, रा. उप्पलवाडी ,वंजारी ले आउट, कामठी रोड, नागपूर याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव समीर खान, रा. न्यु गणेश नगर खरबी असे असल्याची माहीती प्राप्त झाली. टिप्पर क्र एम एच ४९ बी झेड ५१६४ चा चालक नामे मोहम्मद इमरान अब्दुल निसार शेख, वय ३६ वर्ष, रा. चांदमारी नगर, कचरा डंपीग जवळ, नागपूर याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव विनोद भोयर, रा. पारडी, नागपूर असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १)एक १२ चक्का टिप्पर क्रमांक एम.एच ४० सी.टी ९३३४ किंमती ३०,००,०००/—रूपये २) टिप्पर क्रमांक एम एच ४९ बी झेड ५१६४ किंमती ३०,००,०००/—रूपये ३) दोन्ही वहानामधील प्रत्येकी १० ब्रास रेती एकुण २० ब्रास रेती किंमती १,००,०००/— रूपये आणि असा एकुण ६१,००,०००/— रूपयेचा मुद्दे माल माल जप्त करण्यात आला.

**नमुद ट्रक चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम**

**१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे घेण्यात आली पोलीस पाटलांची बैठक

दिनांक ०१/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे उपविभाग उमरेड हद्दीतील पोलीस स्टेशन उमरेड, कुही, वेलतुर आणि भिवापुर येथील पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत श्री दिपक अग्रवाल , सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांनी नमुद उपविभागातील पोलीस पाटलांची बैठक घेवुन त्यांना आगामी येणाऱ्या जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश,चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये आणि आगामी निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन गावात शांतता राखावी. तसेच गावात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत, महीला व बालकांच्या सुरक्षेबाबत, गावतील अवैध धंदयावर आळा घालणेबाबत इत्यादी मुद्दयांवर मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या. श्री विजय माहुलकर, पोलीस उपधिक्षक गृह, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री प्रमोद घोंगे, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा यांनी सुध्दा उपस्थित पोलीस पाटलांना मार्गदर्शन करून सुचना दिल्या. सदर बैठकीस १५० ते २०० पोलीस पाटील हजर होते.







# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ३१/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०१/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मरामाय नगर, अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच काटोल टोल नाका येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने